# समर्थन

## खर्चाचे पूरक विवरणपत्र विश्लेषण

### विभाग निहाय

### मार्च-२०१७

**(महाराष्ट्र राज्य)**


**समर्थन**

११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड स्थानकासमोर,
वसई (पू), पालघर -४०१ २०८ ✆ ०२५०-३०९०१०३/४

**विश्लेषक : रुपेश किर: ९८९२९३९६१७**

✉: samarthanmumbai97@gmail.com

www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**
संस्थापक सदस्य : **श्री. विवेक पंडित**
अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**
उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**
कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**
सचिव : **श्री. सुशील शुक्ल**

- संपादक -
**मुक्ता भारती**

-विश्लेषक-
**रुपेश कीर -९८९२९३९६१७**

- मांडणी व अक्षरजुळणी -
**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.
एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी


**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
**समर्थन**
१ १ ५- धुरी कॉमर्स प्लाझा,
वसई रोड रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. पालघर -४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

**‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर**

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च - २०१७

## खर्चाचे पूरक विवरणपत्र २०१६-१७

**ठळक वैशिष्ट्ये :**

- मार्च, २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण रु. ११ हजार १०४ कोटी ९६ लाखाच्या पूरक मागण्या सादर करण्यात आल्या असून, वर्ष २०१६-१७साठीच्या शेवटच्या पूरक मागण्या आहेत.
- मार्च २०१७च्या पूरक मागण्यांमध्ये १५ विभागांचा समावेश असून मागण्यांची संख्या १५ आहे तर ५३ बाबी अंतर्भूत आहेत.
- वर्ष २०१६-१७च्या अर्थसंकल्पाच्या (मूळ मागणी) तुलनेत मार्च पूरक मागणीचे प्रमाण ४.१०% आहे.
- जुलै, डिसेंबर व मार्च अशा तिन्ही अधिवेशनात मिळून रु. ३३ हजार ६२६ कोटी ३० लाखांच्या पूरक मागण्या सादर करण्यात आल्या असून अर्थसंकल्प २०१६-१७ (मूळ मागणी) च्या तुलनेत १२.४१% झाल्या आहेत.
- राज्य शासनाने सत्तेवर आल्यापासून म्हणजे डिसेंबर २०१४ पासून, मार्च २०१७ पर्यंत एकूण रु. ८० हजार ८३३ कोटी ६३ लाखांच्या विक्रमी पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत. म्हणजे विरोधी बाकांवर असताना वाढत्या पुरवणी मागण्यांविरोधात बोलणाऱ्या सध्याच्या शासनाने पूरक मागण्या सादर करण्यात आघाडी शासनाला मागे टाकले आहे.
- मार्च, २०१५ मध्ये रु. ३ हजार ५३६ कोटी ९६ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या. तर मार्च २०१६ मध्ये रु.४ हजार ५८१ कोटी ३२ लाखांच्या पूरक मागण्या केल्या आहेत. तर सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात म्हणजे मार्च २०१७ मध्ये रु. ११ हजार १०४ कोटी ९६ लाखांच्या पूरक मागण्या करण्यात आल्या आहेत. ही रक्कम मार्च, २०१५ व मार्च २०१६ च्या एकत्रित पूरक मागणीपेक्षाही २ हजार ९८६ कोटी ६८ लाख इतकी जास्त आहे.
- मार्च २०१७ मध्ये शासनाने सादर केलेला अर्थसंकल्प (मूळ मागणी) रु.२ लाख ७० हजार ७६३ कोटींचा होता. त्यात आता रु. ३३ हजार ६२६ कोटी पुरवणी मागण्यांची भर पडली असून एकूण मागणी रु.३ लाख ४ हजार ३९० कोटी २३ लाखांचा झाला आहे.
- १५ विभागांतर्गत रु. ११ हजार १०४ कोटी ९६ लाखांच्या पूरक मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी गृह, महसूल व वन, सार्वजनिक बांधकाम, उद्योग, ऊर्जा व कामगार तसेच ग्रामविकास व जलसंधारण या ५ विभागांवर दि. १५ मार्च, २०१७ रोजी म्हणजे केवळ एक दिवस चर्चा होणार आहे. त्यात १० विभागांतर्गत रु. ८०७ कोटी ७१ लाखांच्या पूरक मागण्या विनाचर्चा मंजूर केल्या जातील.
- जुलै, २०१६ मध्ये रु. १३ हजार ३२ कोटी २१ लाखांच्या पूरक मागण्या सादर करण्यात आल्या होत्या.
- डिसेंबर, २०१६ मध्ये रु. ९ हजार ४८९ कोटी १३ लाखांच्या पूरक मागण्या सादर करण्यात आल्या होत्या.

✍ मार्च, २०१७ मध्ये सादर केलेल्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रात आकस्मिकता निधीतून २ विभागांतर्गत १३५ कोटी ६२ लाख रुपये काढण्यात आले आहेत.

✍ जुलै, डिसेंबर २०१६ व मार्च २०१७ या तिन्ही अधिवेशनात मिळून वर्ष २०१६-१७ साठी आकस्मिकता निधीतून काढण्यात आलेली रक्कम रु.२६६ कोटी ८९ लाख आहे.

✍ मार्च २०१७ मध्ये १५ विभागांनी केलेल्या एकूण रु.११ हजार १०४ कोटी ९६ लाखांच्या पूरक मागणीपैकी उद्योग, ऊर्जा व कामगार, गृह, सामाजिक न्याय व वि.स., महसूल व वन विभाग, सार्वजनिक बांधकाम या ५ विभागांच्या पूरक मागण्यांची रक्कम रु. १० हजार ८०६ कोटी ९९ लाख आहे. त्याचे एकूण पूरक मागणीशी प्रमाण ९७.३१% आहे. म्हणजे उर्वरित १० विभागांनी केवळ रु. २९७ कोटी ९७ (२.६९%) लाखांच्या पुरवणी मागण्या केल्या आहेत.

✍ उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने सर्वात अधिक म्हणजे रु. ८ हजार ७५६ कोटी २२ लाखांच्या पूरक मागण्या केल्या असल्या तरी त्यामध्येही केवळ 'ऊर्जा' विभागांतर्गत राज्यातील कृषि व पंपधारकांना व यंत्रमागधारकांना अर्थसहाय्य, उज्ज्वल डिस्कॉम योजनेसाठी महावितरण कंपनीला कर्जाची परतफेड करण्यासाठी तरतूद असे एकूण रु. ८ हजार ७५६ कोटी २२ लाखांची पूरक मागणी करण्यात आली आहे. ही पूरक मागणी मार्च, २०१७च्या पूरक मागणी मध्ये सर्वात मोठी पूरक मागणी आहे. एकूण पूरक मागणीमध्ये या मागणीचे प्रमाण ७८.८४% आहे.

## मार्च, २०१७ च्या महसूली व भांडवली पूरक मागण्या

तक्ता क्र १. *रु. कोटीत*

| | भारित | दत्तमत | एकूण |
|---|---|---|---|
| महसुली | १७०.५६ | ५,५३८.१९ | ५,७०८.७५ |
| भांडवली | - | ५,३९६.२० | ५,३९६.२० |
| एकूण | १७०.५६ | १०,९३४.३९ | ११,१०४.९६ |

*स्रोत :खर्चाचे पूरक विवरणपत्र मार्च, २०१७*

✍ मार्च २०१७च्या अर्थसंकल्पात सादर करण्यात आलेल्या पूरक मागण्या या रु.११ हजार १०४ कोटी ९६ लाख रुपयांच्या असून त्यामध्ये महसुली स्वरुपाच्या रु.५ हजार ७०८ कोटीं ७५ लाखांच्या आहेत तर रु. ५ हजार ३९६ कोटी २० लाखांच्या पूरक मागण्या या भांडवली स्वरुपाच्या आहेत.

✍ रु.११ हजार १०४ कोटी ९६ लाखांच्या पूरक मागण्यांमध्ये दत्तमत स्वरुपाच्या रु.१० हजार ९३४ कोटी ३९ (९८.४५%)लाखांच्या मागण्या आहेत तर भारित स्वरुपाच्या रु.१७० कोटी ५६ (१.५५%) लाखांच्या पूरक मागण्या आहेत.

## मूळ मागणीच्या तुलनेत पूरक मागणीचे प्रमाण १२.४१ टक्के

*तक्ता क्र २.* *रु. कोटीत*

| मागण्या | रक्कम | एकूण मागणीशी प्रमाण |
|---|---|---|
| मार्च मधील मूळ मागणी★ | २,७०,७६३.९३ | ८८.९५ |
| जुलै, २०१६ पूरक मागणी | १३,०३२.२१ | ४.२९ |
| डिसेंबर, २०१६ पूरक मागणी | ९,४८९.१३ | ३.१२ |
| मार्च, २०१७ पूरक मागणी | ११,१०४.९६ | ३.६४ |
| एकूण मागणी | ३,०४,३९०.२३ | १००.०० |

*★ मूळ मागणी = राज्य अर्थसंकल्प २०१६-१७* *स्रोत : खर्चाचे पूरक विवरणपत्र व अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका.*

- राज्याचा एकूण अर्थसंकल्प जुलै, डिसेंबर व मार्च मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून एकूण रु.३ लाख ४ हजार ३९० कोटी २३ लाखांचा झालेला आहे.
- जुलै, डिसेंबर व मार्च अशा तिन्ही अधिवेशनात मिळून रु. ३३ हजार ६२६ कोटी ३० लाखांच्या पूरक मागण्या सादर करण्यात आल्या असून अर्थसंकल्प २०१६-१७ (मूळ मागणी)च्या तुलनेत १२.४१% झाल्या आहेत. तर एकूण मागणीत हे प्रमाण ११.०५% आहे.

## मार्च, २०१७ मध्ये सर्वाधिक पूरक मागण्या केलेले विभाग

*तक्ता क्र ३.* *रु. कोटीत*

| विभाग | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मूळ मागणी | एकूण मागणी (३ + ४) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| उद्योग, ऊर्जा व कामगार | ३ | ८,७५६.२२ | ९,८४०.१९ | १८,५९६.४१ |
| गृह | १ | १,००२.८८ | १५,०९०.६७ | १६,०९३.५५ |
| सामाजिक न्याय व वि.स. | १ | ५०९.७४ | १२,२०२.४४ | १२,७१२.१८ |
| महसूल व वन विभाग | ४ | ३११.४१ | १३,६३९.४७ | १३९५०.८८ |
| सार्वजनिक बांधकाम | ५ | २२६.७४ | १०,१७५.९० | १०४०२.६४ |
| एकूण | १४ | १०,८०६.९९ | ६०,९४८.६७ | ७१,७५५.६६ |

*स्रोत : खर्चाचे पूरक विवरणपत्र व अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका.*

- १५ विभागांनी केलेल्या एकूण रु.११ हजार १०४ कोटी ९६ लाखांच्या पूरक मागणीपैकी सर्वाधिक पुरवणी मागणी केलेल्या ५ विभागांच्या पूरक मागण्यांची रक्कम रु. १० हजार ८०६ कोटी ९९ लाख आहे. त्याचे एकूण पूरक मागणीशी प्रमाण ९७.३१% आहे.
- उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने सर्वाधिक म्हणजे रु. ८ हजार ७५६ कोटी २२ लाखांच्या पूरक मागण्या केल्या असून त्यामध्ये राज्यातील कृषि व पंपधारकांना व यंत्रमागधारकांना अर्थसहाय्य, उज्ज्वल डिस्कॉम योजनेसाठी महावितरण कंपनीला कर्जाची परतफेड करण्यासाठी तरतूद असे एकूण रु. ८ हजार ७५६ कोटी २२ लाखांची पूरक मागणी करण्यात आली आहे. मार्च, २०१७च्या पूरक मागणी मध्ये सर्वात मोठी पूरक मागणी असून तिचे प्रमाण ७८.८४% आहे.

# एका दिवसात रु. १० हजार २९७ कोटी २५ लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा!

## विधिमंडळ कामकाजाला फासली हरताळ

*तक्ता क्र.४* *रु. कोटीत*

| १५ मार्च, २०१७ | | | | |
|---|---|---|---|---|
| विभाग व विभागांची संख्या | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मूळ मागणी | पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी प्रमाण |
| गृह | १ | १,००२.८८ | १५,०९०.६७ | ६.६४ |
| महसूल व वन | ४ | ३११.४१ | १३,६३९.४७ | २.२८ |
| सार्वजनिक बांधकाम | ५ | २२६.७४ | १०,१७५.९० | २.२२ |
| उद्योग, ऊर्जा व कामगार | ३ | ८,७५६.२२ | ९,८४०.१९ | ८८.९८ |
| ग्रामविकास व जलसंधारण | ४ | लाक्षणिक | १४,७३४.४३ | ०.० |
| एकूण | १७ | १०,२९७.२५ | ६३,४८०.६६ | १६.२२ |

*(टीप: ग्रामविकास व जलसंधारण विभागाची रु. ४००० ची लाक्षणिक मागणी आहे.)* *स्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र*

- अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१७-१८च्या पहिल्या दिवशी दि.०६ मार्च, २०१७ रोजी वर्ष २०१६-१७च्या शेवटच्या पूरक मागण्या सादर करण्यात आल्या. यामध्ये १५ विभागांतर्गत रु. ११ हजार १०४ कोटी ९६ लाखांच्या पूरक मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी गृह, महसूल व वन, सार्वजनिक बांधकाम, उद्योग, ऊर्जा व कामगार तसेच ग्रामविकास व जलसंधारण या ५ विभागांवर दि. १५ मार्च, २०१७ रोजी चर्चा होणार आहे. त्यामध्ये रु. ८०७ कोटी ७१ लाखांच्या पूरक मागण्या विनाचर्चा मंजूर केल्या जातील.

- उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाची मूळ मागणी ९ हजार ८४० कोटी १९ लाख रुपयांची होती. तर जुलै, डिसेंबर २०१६ व मार्च २०१७च्या पुरवणी मागण्यांची एकूण रक्कम १० हजार २८२ कोटी ४७ लाख रुपये झाली आहे. तर उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या एकूण मागणीची एकूण रक्कम २० हजार १२२ कोटी ६६ लाख रुपयांवर पोहोचली आहे.

# आकस्मिकता निधीतून काढले १३५ कोटी ६२ लाख रुपये

## त्यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाचीच रक्कम १३३ कोटी

## जल पूजन आणि भूमी पूजनाच्या प्रसिद्धीसाठी आकस्मिकता निधीचा वापर

*तक्ता क्र.४* *रु. कोटीत*

| विभाग | बाब क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| **महसूल व वन** | ३ | मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वाळुच्या लिलावाची ठेव रक्कम परत करण्यासाठी तरतूद. | २.६२ |
| **सार्वजनिक बांधकाम** | १७ | मार्ग व पूल यांच्यासाठी तरतूद. | १२५.०० |
| | १८ | समुद्रातील शिवाजी महाराज स्मारक, मुंबई मेट्रो मार्ग, शिवडी न्हावा-शेवा प्रकल्प,मुंबई रेल्वे प्रकल्प यांच्या उद्घाटन, जाहिरात व प्रसिद्धीसाठी खर्च | ८.०० |
| | | **एकूण** | १३५.६२ |

*स्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र*

- **वर्ष २०१६-१७साठी वर्ष २०१७-१८च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण १५ विभागांसाठी एकूण रु.११ हजार १०४ कोटी ९६ लाखांच्या पूरक सादर करण्यात आल्या आहेत त्यापैकी आकस्मिकता निधीतून २ विभागांतर्गत १३५ कोटी ६२ लाख रुपये काढण्यात आले आहेत. एकूण पूरक मागण्यांमध्ये आकस्मिकता निधीचे प्रमाण १.२२ टक्के आहे.**

- **मार्ग व पूल हा केंद्रीय मार्ग निधी आहे त्यासाठी मूळ अर्थसंकल्पात सहज तरतूद करणे शक्य असताना १२५ कोटी रुपयांची रक्कम तातडीची म्हणून विधानमंडळाची मंजूरी न घेता दि. ७ फेब्रुवारी २०१७ रोजी आकस्मिकता निधीतून काढण्यात आली.**

- **मागील वर्षभरात ३०२२ शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्या, त्यांना मदत करण्यासाठी शासनाकडे पैसे नाहीत. त्याचप्रमाणे राज्यभरात १८,००० बालके कुपोषणाचे बळी ठरले आहेत. मात्र कुपोषण निर्मूलनासाठी ज्या योजना राबविल्या जात आहेत त्यासाठी शासनाकडे पुरेसा निधी नाही. बलात्काराने पिडीत महिलांसाठी राज्यात 'मनोधैर्य' योजना राबविली जात आहे. मात्र या बलात्काराला बळी पडलेल्या महिलांना मदत करण्यासाठी शासनाकडे निधी नाही.**

**असे असताना समुद्रातील शिवाजी महाराज स्मारक, मुंबई मेट्रो मार्ग, शिवडी न्हावा-शेवा प्रकल्प, मुंबई रेल्वे प्रकल्प यांच्या उद्घाटन, जाहिरात व प्रसिद्धीसाठी शासनाने आकस्मिकता निधीतून ८ कोटी रुपये खर्च केले आहेत. अशा प्रकारे आकस्मिकता निधीतून रक्कम काढणे हे अर्थसंकल्पीय नियम व आकस्मिकता निधी नियमांचा भंग करीत आहे. याबाबत अंदाज समितीने तीव्र शब्दात याआधी नापसंती व्यक्त केली आहे. अशा प्रकारची आर्थिक बेशिस्ती टाळण्यासाठी एक नियमावली तयार करण्याची गरज आहे, असे म्हटले होते मात्र अजूनपर्यंत तशी नियमावली शासनाने तयार केलेली नाही.**

# फडणवीस सरकारच्या पूरक मागण्या पोहोचल्या ८० हजार ८३३ कोटींवर!

## सरकारला पूरक मागण्यांवर नियंत्रण ठेवण्यात अपयश

## (डिसेंबर, २०१४ ते मार्च २०१७)

*आलेख क्र. १* *(रु. कोटीत)*




*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र*

- युती शासनाने सत्तेवर आल्यापासून म्हणजे नोव्हेंबर, २०१४ पासून मार्च, २०१७ पर्यंत ८ वेळा पूरक मागण्या सादर केल्या. याची एकूण रक्कम ८० हजार ८३३ कोटी ६३ लाख झाली आहे.

- हेच शासन विरोधी बाकांवर असताना तात्कालीन शासनावर वाढत्या पुरवणी मागण्यांबाबत, राज्यावरील वाढत्या कर्जाबाबत, राज्यातील आर्थिक बेशिस्तीबाबत सतत ओरडत होते. मात्र स्वत:चे शासन आल्यानंतर ज्याप्रमाणे विक्रमी पुरवणी मागण्या केल्या आहेत. हे लक्षात घेता सध्याचे शासन आर्थिक नियोजन करण्यात अपयशी ठरले आहे.

- मार्च, २०१५ व मार्च २०१६ वगळता प्रत्येक अधिवेशनात पूरक मागण्यांसाठी ८ हजार ते १६ हजार कोटी रुपयांची रक्कम काढण्यात आली आहे.

- डिसेंबर २०१५ मध्ये १६ हजार ९४ कोटी रक्कम काढण्यात आली होती. ही रक्कम युती शासनाने नोव्हेंबर २०१४ ते मार्च २०१७ या कालावधीतील सादर केलेल्या पूरक मागण्यांमध्ये सर्वात मोठी पूरक मागणी ठरली आहे.